# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 28/10/2019 (सोमवार)

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर मौजा निमखेडा येथे दिनांक 27/10/2019 चे 17:00 वा. ते 17:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सोरभ दशरथ हटवार, वय 22 वर्ष, रा. मांगली गोसाई, ता. मौदा यांनी त्यांची एमएच–40/ एक्स –2291 क्रमांकाची हिरो होन्डा स्प्लेंडर मोटरसायकल रेल्वे गेटच्या बाजुला उभी करून ते निमखेडा येथ बाजार करायला गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. 30,000/–रू. ची मोटरसायकल चोरी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ महंत हे करीत आहे.

## दुखापत

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत रेल्वे स्टेशन रोड, कन्हान येथे दिनांक 26/10/2019 चे 22:30 वा. ते 22:50 वा. दरम्यान फिर्यादी हे मित्रासह मोटरसायकलने फुल व हार घेन्याकरिता रेल्वे स्टेशन रोड जवळ आले असता आरोपी नामे– सचिन मदन जामकर, रा. रेल्वे स्टेशन रोड कन्हान हा फिर्यादी जवळ येवुन म्हणाला की, 'तेरे घर पर कार्यक्रम था तो, तु अपने घरवाले के सामने ज्यादा बात कर रहा था' या कारणावरून आरोपीने फिर्यादीशी वाद घातला. यानंतर आरोपीने फिर्यादीला हातबुक्कीने, लाकडी दांडयाने डोक्यावर व नाकावर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 324, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र चौधरी 7498308932 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर बस स्टॉप मौदा येथे दिनांक 27/10/2019 चे 12:30 वा. ते 13:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. चंदा सुनिल चापले, वय 37 वर्ष, रा. हनुमान नगर, मौदा यांचे मौदा बसस्टॉप येथे स्वतःच्या मालकीची फळ विक्रीचे दुकान आहे. फिर्यादीच्या दुकानासामोर आरोपी नामे– योगेश विठ्ठल कुरंजेकर, रा. मौदा याने फुलाची दुकान लावली फिर्यादीने त्यास हटकले. या कारणावरून आरोपीने फिर्यादी सोबत वाद–विवाद केला. तसेच आरोपीने फिर्यादीस काठीने मारहाण करून पाहून घेन्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा चांगदेव कुथे हे करीत आहे.

3) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावर मौजा आंध्रा बॅकेचे समोर हायवे क्र. 44 वर नागपूर चंद्रपुर रोडवर येथे दिनांक 27/10/2019 चे 05:30 वा. ते 05:40 वा. दरम्यान आरोपी नामे– रवी वामनराव सायवान, वय 39 वर्ष, रा.गोन्ही याने फिर्यादींचा भाचा नामे– शादीक शेख, वय 28 वर्ष, रा. गोन्ही याला जुन्या वादाच्या कारणावरून अश्लिल शिवीगाळ करून लोखंडी रॉडने कानावर मारहाण जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीस मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जाकीर वल्द अहमदअली सय्यद, वय 42 वर्ष, रा. गोन्ही यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 294, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ मोरेश्वर नागपूरे 8888821360 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर